# डॉक्टरसह तिघांना ५ दिवसांची पोलीस कोठडी

**धुळ्यातील स्त्री भ्रूण हत्या प्रकरण**

■ **धुळे । प्रतिनिधी**

शहरातील साक्री रोडवरील सुमन हॉस्पिटलमध्ये स्त्री भ्रूण हत्या केल्याच्या प्रकरणात डॉ. सोनल वानखेडे आणि दोन नर्स विरुद्ध रात्री उशिरा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तिघांना आज दुपारी न्यायालयात हजर केले असता पाच दिवसांची पोलिस कोठडी देण्यात आली.

महापालिकेच्या आरोग्याधिकारी डॉ.संपदा कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने काल सुमन हॉस्पिटलवर छापा टाकल्यानंतर स्त्री भ्रूणहत्येचा प्रकार उजेडात आला. सायंकाळी डॉ. कुलकर्णी यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर, पोलिसांनी सुमन हॉस्पिटलमधील डॉ. सोनल वानखेडे, नर्स रोहिणी दीपक शिरसाठ आणि नर्स शोभा नरेंद्र सरदार यांच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तिघांना आज दुपारी न्यायालयात हजर करण्यात आले. मुख्य न्यायदंडाधिकारी जयश्री पुनावाला यांनी तिघांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पी. जे. राठोड हे करत आहेत.

# ढगाळ वातावरणामुळे पपई, केळी, आंबा धोक्यात

■ **नंदुरबार । प्रतिनिधी**



गेल्या आठवडयात हवामान खात्याने एप्रिलच्या पहिल्या आठवडयात पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली होती. त्यानुसार गेल्या दोन दिवसांपासून संपुर्ण जिल्हाभर ढगाळ निर्माण झाले आहे. काही ठिकाणी पावसाचा शिडकावादेखील झाला आहे. मात्र, ढगाळ वातावरणामुळे मात्र पपई, केळी, आंबा आदी पिके धोक्यात आली आहे.

हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजाप्रमाणे गेल्या दोन दिवसांपासून जिल्हयात ढगाळ वातावरण असून काही ठिकाणी पावसाचा शिडकावादेखील झाला आहे. आज दिवसभर ऊन सावल्यांचा खेळ सुरू होता. दुपारनंतर आकाशात ढग भरून आले होते. सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास काही ठिकाणी पावसाचा शिडकावा झाला. ढगाळ वातावरणामुळे तापमान ३९ अंशावर होते तर आज ३६ अंशावर आले. ढगाळ वातावरणामुळे वाढत्या तापमानापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. मात्र आर्द्रतेत वाढ झाल्याने कमालीचा उकाडा जाणवत आहे. पुढील दोन दिवस जिल्ह्यावर वादळी पावसाचे सावट असल्याने पपई, केळी व आंबा आदी पिके धोक्यात आली आहेत.

जिल्ह्यावर वादळी अवकाळी पावसाचे सावट गुरुवारपर्यंत रा- हणार असल्याचे शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.

रब्बी हंगामातील गहू, हरभराची काढणी ९५ टक्के पूर्ण झाली आहे. मात्र, सातपुड्यात आंब्याला मोहर आला आहे. वादळी पाऊस झाल्यास मोहर गळून उत्पादनावर परिणाम होण्याची भीती आंबा उत्पादकांनी व्यक्त केली आहे. नंदुरबार, तळोदा, शहादा आदी भागात केळी, पपई मोठ्या प्रमाणात शेतात उभी आहे. वादळी पाऊस झाल्यास केळी व पपईला नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्ह्यात यावर्षी तापमानात चढउतार होताना दिसून येत आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापासून थंडीचे प्रमाण कमी झाले. मात्र, मार्च महिन्यातच तापमानाचे प्रमाण वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, आता ढगाळ वाता- वरण असल्यामुळे वातावरणात कमालीची घट झाली आहे.

मंगळवारी सकाळपासून ढगाळ वातावरण राहिले. दुपारी सूर्यदर्शन झाले, मात्र पुन्हा ३ वाजेपासून सूर्यास्तापर्यंत ढगाळ वातावरण कायम होते. आर्द्रता २० ते २२ टक्क्यांवर गेल्याने मात्र उकाडा प्रचंड जाणवला.

जिल्ह्यात दोन दिवस वाता- वरणात बदल राहून कुठेही तुरळक स्वरूपाचा पाऊस होऊ शकतो. हवेचा वेगही वाढणार असल्याने शेतकऱ्यांनी रब्बी हंगामातील पिकांची हार्वेस्टिंग करून माल सुरक्षित स्थळी न्यावा. लावली केलेल्या पपई, केळी रोपांना काडी, प्लास्टिक आच्छादनांनी आधार द्यावा. कोरडा चारा गोठ्यात भरून नियोजन करावे, अशी माहिती कृषि विज्ञान केंद्राचे विशेष विषय तज्ञ पद्माकर कुंदे यांनी दिली.

## निधन वार्ता

### विष्णू दत्तात्रय बरकले; आज अंत्ययात्रा



**भुसावळ । प्रतिनिधी ।** येथील पुरुषोत्तम नगर मधील रहिवासी विष्णू दत्तात्रय बरकले (गुरुजी) (वय ८२) यांचे दि. १ एप्रिल रोजी दुपारी १२.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पुतणे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा आज दि. २ रोजी सकाळी ९ वाजता राहत्या घरून निघेल.

पान १ वरुन ...

### कचरा व्यवस्थापन अत्यावश्यकच

घेण्यासारखे ठरु शकेल. तिथली सध्याची कचरा डेपोची जागा पुरेशी नाही. दुसरी व्यवस्था करण्यासाठी आत्तापर्यंत दोनदा जागा निश्चित करण्यात आल्या. पण त्या-त्या ठिकाणच्या स्थानिक विरोधामुळे ती समस्या प्रलंबितच आढळतात. घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील समस्यांवर कायमस्वरुपी उत्तरे शोधण्याची संधी आगामी कुंभमेळा देऊ शकेल. कुंभमेळ्यानिमित्त पायाभूत सुविधांची असंख्य कामे केली जाणार आहेत. त्यात घनकचरा व्यवस्थापन हा प्राधान्यक्रमाचा मुद्दा बनणे अपेक्षित आहे. कारण कुंभमेळा काळात लाखो भाविक भेट देतील, अशी अपेक्षा आहे. म्हणजेच कचरा निर्मितीचे प्रमाणही प्रचंड असू शकेल. हे झाले उपरोक्त दोन ठिकाणचे. पण अन्य ठिकाणीही हा मुद्दा धसास लागायला हवा. कारण कचऱ्यामुळे सामाजिक आरोग्य प्रभावित होते. तेव्हा त्याच्या व्यवस्थापन सुविधेसाठी गावेही पुढाकार घेऊ शकतील. लोकचळवळ उभी करु शकतील. लोकचळवळ किंवा सामाजिक आंदोलनाच्या वातावरणात राजकीय इच्छाशक्तीदेखील सक्रिय होते याचा अनुभव समाज अनेकदा घेतो हे लक्षात घेतले जाईल का?

### बुलडोझर बाधितांना १० लाख द्या!

प्रदेशातील गुन्हेगारांच्या मालमत्तेवर बुलडोझर कारवाई करण्यात येत असल्यामुळे योगी आदित्यनाथ यांचे सरकार चांगलंच चर्चेत आहे. अनेक गुन्हेगारांच्या मालमत्तेवर बुलडोझर कारवाई करण्यात आल्याचेही पाहायला मिळाले. आता एका प्रकरणातील बुलडोझर कारवाईवरून सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला चांगलेच फटकारले आहे.

यावेळी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, देशात कायद्याचे राज्य आहे आणि कोणत्याही नागरिकाचे निवासी घर किंवा बांधकाम अशा प्रकारे पाडले जाऊ शकत नाही. न्यायमूर्ती अभय एस ओका आणि उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान टिप्पणी करताना म्हटले की ही प्रकरणे आमच्या विवेकाला धक्का देतात. दरम्यान, याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी म्हटले की, राज्य सरकारने चुकीच्या पद्धतीने घरे पाडली. कारण त्यांना वाटले की ही जमीन गुंड-राजकारणी अतिक अहमदची आहे. मात्र, तो २०२३ मध्ये पोलीस चकमकीत मारला गेला होता.

### पंतप्रधानांची निवृत्ती भोंग्यावर ठरत नाही-बावनकुळे

भाजपचे नेते अटलबिहारी वाजपेयी वयाच्या ७९ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. तर मोरारजी देसाई (८३ वर्षे) आणि डॉ. मनमोहन सिंग तर वयाच्या ८१ वर्षांपर्यंत पंतप्रधान होते. पण मानसिक संतुलन बिघडल्याने भाजप द्वेषाची कावीळ झालेल्या राऊतांना हे आठवणार नाही, असा टोला बावनकुळे यांनी लगावला.

दरम्यान, सर्वज्ञानी संजय राऊत म्हणजे स्वयंघोषित विश्वगुरू आहेत. या विश्वगुरूने स्वतःच्या घराकडे आधी लक्ष द्यावे. भाजप, पंतप्रधान नरेंद्र मोदी वगैरेंवर बोलण्याची एकतर त्यांची कुवत नाही आणि तुमच्या विश्लेषणाची आमच्या पक्षाला गरजही नाही. भाजपचा पुढचा वारसदार वगैरेच्या गोष्टी बोलण्यापेक्षा जरा स्वतःच्या गटाला पडलेले खिंडार सांभाळा, असा सल्ला भाजपच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी दिला आहे.

# २ लाखात फसवणूक; तिघांविरुद्ध गुन्हा

■ **नंदुरबार । प्रतिनिधी**

ग्रीन चिल्ली प्लॉटमध्ये ६ टन माल असल्याचे सांगून २ लाख रुपये ॲडव्हान्स घेवून एकाची फसवणूक केल्याची घटना शहादा येथे घडली. याप्रकरणी तिघांविरुद्ध शहादा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.९ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री ९.३० वाजता दीपक हनुमान सागट, सादिक पाशा अब्दुल रहिम, पंकजकुमार पटेल (सर्व रा.शहादा) यांनी चैतन्य कन्हैय्यालाल ढोढरे याला ग्रीन चिल्ली प्लॉटमध्ये एकुण ०६ टन माल असल्याचे आमिष दाखवुन माल न देता २ लाख रुपये ॲडव्हॉस घेवुन फसवणूक केली.

पैसे घेवूनही माल दिला नाही. याबाबत शहादा पोलीस ठाण्यात चैतन्य ढोढरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भा.न्या.सं. कलम ३ (५) ३१६ (२) ३१८ (४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक छगन चव्हाण करीत आहेत.

# रेल्वेच्या तिकिटावरुन पटली मयताची ओळख

■ **चाळीसगाव । प्रतिनिधी**

शहरातील भडगाव रोडवरील वाणी मंगल कार्यालयासमोर पूजा स्वीटच्यावर असलेल्या डी.के. टेलर दुकानाच्या बाजूला असलेल्या छताला एका ४५ वर्षीय अनोळखी इसमाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना दि.२९ रोजी सकाळी ८.२५ वाजेपूर्वी उघडकीस आली होती. या घटनेने एकच खळबळ उडाली होती. याप्रकरणी कुठलाही पागादोरा नसतांना चाळीसगाव शहर पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे व रेल्वे तिकीटावरुन तांत्रिक विश्लेषणावरून शिताफीने तपास करून या अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्यास यश मिळवले.

आत्महत्या करणारा इसम उत्तराखंडातील रहिवासी असून तो मुंबईत एका हॉटेलवर कामाला असल्याचे निष्पन्न झाले आहे. या मयतास हॉटेल मालकाने त्यास त्याच्या गावी जाण्यासाठी रेल्वेत बसवून दिले होते, परंतू डोक्यावर परिणाम झाल्याने तो चाळीसगावी उतरला आणि भडगाव रोडला पोहचत त्याने दुकानाच्या शटरला गळफास घेतला. या घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस स्टेशनचे घटनास्थळी जावून पाहणी केली व पंचनामा केला. मृत इसमाची कुठलीही ओळख पटून आली नव्हती. पोलीसांनी आसपासच्या हॉटेलचालकांना विचारणा केली.

पोलीसांच्या चौकशीत रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेजमध्ये तो रेल्वे स्टेशनकडून पायी आल्याचे तपासात समोर आले. पोलीसांनी रेल्वे स्टेशन गाठून तांत्रिक तपासणीत रेल्वे स्टेशनचे फुटेज प्राप्त करून त्याचा सखोल शोध घेतला असता हा इसम मुंबईहून रेल्वेत बसल्याची माहिती मिळाली. त्याने मुंबईत जेथून तिकीट काढले तेथील तिकीट क्लार्ककडे पोलीसांनी संपर्क साधून त्याचा मोबाईल क्रमांक मिळवला, या क्रमांकावरून या इसमाची ओळख पटली. किशनकुमार सबलाकुमार रा. परोगी तहसील नयनबाग उत्तराखंड असे या मृत इसमाचे नाव असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या डोक्यावर परिणाम झाल्याने मालकाने त्याला त्याच्या गावी जाण्यासाठी त्यास मुंबई ते दिल्लीपर्यंतचे तिकीट काढून देत पंजाब एक्सप्रेसमध्ये बसवून दिले. डोक्यावर झालेला परिणाम आणि दारुचा अंमल यामुळे तो दिल्लीत न पोहचता थेट चाळीसगाव रेल्वे स्थानकावर उतरला. त्या धुंदीत तो पायी स्टेशनवरून भडगाव रस्त्यावर आला आणि तेथे भल्या पहाटे दुकानाच्या छताला गळफास घेऊन आत्महत्या केली.

चाळीसगाव शहर पोलीस स्टेशनच्या पथकाने रेल्वे तिकीटाच्या आधारे मृत इसमाची ओळख पटविण्याकामी यशस्वी कामगिरी बजावली. मृतदेहाची ओळख पटल्यानंतर पोलीसांनी उत्तराखंड प्रशासनाशी संपर्क साधून मृत इसमांच्या भावांच्या ताब्यात दिला.

# थकबाकीपोटी हॉटेल सील; पालिकेची कारवाई

■ **अमळनेर । प्रतिनिधी -**

मालमत्ता कर थकबाकीपोटी पालिकेने कठोर कारवाई करत हॉटेल साई प्रसाद सील केली असून दोन व्यापाऱ्यांना एक दिवसाची संधी देण्यात आली आहे. अमळनेर पालिकेची नागरिकांकडे पाणीपट्टी व मालमत्ता कर रुपात सुमारे तीन कोटी थकबाकी आहे. काही मालमत्ता धारक, व्यापारी कर भरण्यास टाळाटाळ करीत आहेत. पालिकेने थकीत ग्राहकांना नोटिसा आणि तोंडी सूचना तसेच वृत्तपत्रात नाव प्रसिध्द करूनही नागरिकांनी बाकी अदा केली नाही. त्यामुळे मुख्याधिकारी तुषार नेरकर यांनी मालमत्ता कर न भरणाऱ्या नागरिकांच्या मालमत्ता सील करण्याचे आदेश दिले. उपमुख्याधिकारी रवींद्र चव्हाण, रवींद्र लांबोळे, अतिक्रमण विभाग प्रमुख राधेश्याम अग्रवाल, जगदीश चौधरी, रोहित लांबोळे, इथिक संदानशिव, यश लोहरे, जगदीश बिऱ्हाडे यांनी मार्च अखेरच्या दिवशी धुळे रोडवरील साईप्रसाद हॉटेल सील केली आहे. साईप्रसाद हॉटेलकडे पालिकेची २ लाख ८० हजार रुपये थकबाकी आहे. त्याचप्रमाणे देवाज हॉटेल आणि योगेश हॉटेल यांच्याकडे देखील थकबाकी असून त्यांनी एक दिवसांची मुदत मागितली आहे असे पालिकेतर्फे सांगण्यात आले.

**कल्याण**

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १०-०२-२०२५ १५-०२-२०२५ | ३५९ ७१ ४७० | ३३६ २७ १७९ | ४८० २१ १५५ | ६७९ २३ ६७० | १८० ९५ ३४८ | १३८ २९ २२५ |
| १७-०२-२०२५ २२-०२-२०२५ | २५५ २१ १३७ | ४७० १९ ९०० | २४७ ३३ ७८८ | ३९९ १७ १७९ | २६९ ७६ ५५६ | २२४ ८४ ४५५ |
| २४-०२-२०२५ ०१-०३-२०२५ | ४४७ ५७ २६९ | ३६७ ६५ २६७ | १३६ ०६ ४५७ | १८० ९७ १७९ | २७० ९३ ३३७ | ६९० ५३ १२० |
| ०३-०३-२०२५ ०८-०३-२०२५ | ७७८ २१ ५८८ | ४६० ०१ ६६९ | ५५८ ८० ६७७ | ३०० ३९ २८९ | १२९ २० ४६० | ३७० ०१ १२८ |
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | ७८९ ४९ ५६८ | १२५ ८९ ४६९ | ३६९ ८३ १५७ | १५६ २९ १८० | ● | १३० ४४ ७८९ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | ५५८ ८२ ७७८ | २४४ ०१ २९० | ५७९ १४ ३४७ | १२० ३३ ७८८ | १६० ७० ६७७ | ८८० ६६ २७७ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १११ ३३ १३९ | ६७७ ०० ३३४ | ४७० १० ५५० | ८९० ७९ २८९ | २५७ ३४ १५५ | २३४ ९६ ५५६ |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | १२८ १२ ३३६ | ४६० ०४ ३५६ | | | | |

**मिलन डे**

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०-०२-२०२५ १५-०२-२०२५ | ७८९ ४९ ५६८ | ५७० २३ १५७ | ३३६ २० ५७८ | १६६ ३८ २३३ | १७८ ६४ २३९ | ६६९ १३ ३३७ | ● |
| १७-०२-२०२५ २२-०२-२०२५ | १३५ ९५ २५८ | १३० ४२ ६७९ | ३५० ८६ १७८ | ६७० ३७ २६९ | २३७ २३ १२० | ५७८ ०४ ६९९ | ● |
| २४-०२-२०२५ ०१-०३-२०२५ | २६६ ४७ ४५८ | ३५९ ७५ ४५६ | ६९० ५० ३८९ | २६७ ५९ ४६९ | ५६९ ०७ ३५९ | ३४० ७८ २६० | ● |
| ०३-०३-२०२५ ०८-०३-२०२५ | २४७ ३७ ६६८ | ११५ ७८ ४६८ | १३५ ९६ १२३ | २३० ५२ १५६ | ५७८ ०२ २३७ | २६० ८१ ४७० | ● |
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | २३९ ४४ २४८ | ६७८ १३ १४८ | ३४५ २९ १४४ | ७७० ४२ २५५ | ● | १४९ ४७ २७८ | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १२० ३६ ११४ | ५७९ १२ ५८९ | ३८८ ९५ १७७ | १३८ २८ ४७७ | ३५९ ७९ १२६ | ५८८ १३ ६७० | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १३८ २८ २६० | ७८८ ३७ २५० | ३४६ ३८ १७० | १६० ७१ ३८० | १४८ ३४ ३५६ | १४५ ०३ ६७० | ● |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | ४५५ ४५ १५९ | ६७० ३६ ३६७ | | | | | ● |

**मिलन नाईट**

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| २३५ ०२ २४६ | १३६ ०८ ८०० | ३६६ ५५ २६७ | ४९९ २९ १८० | २३४ ९८ ३५० | १५८ ४५ १४७ |
| ११६ ८९ २३४ | १५९ ५७ १६० | २६० ८२ ५७० | २३८ ३६ ११४ | ३५८ ६२ ११० | ७८० ५२ ३९० |
| ३७० ०५ ४४७ | ३५८ ६३ २३८ | ५५६ ६५ २३० | २५० ७९ २७० | ३८८ ९४ ६९९ | ११८ ०३ २३८ |
| १२६ ९५ ४५६ | १२४ ७० २४४ | ३३० ६७ ८९० | ५७८ ०९ ३७९ | २३७ २६ ६०० | ३६९ ८९ ५६८ |
| ४६७ ७८ ४५९ | ४५८ ७८ ४७७ | ३७९ ९३ ३४६ | ३४९ ६९ ३७९ | ● | ४९० ३१ १४६ |
| ४६७ ७७ २६९ | ११३ ५१ ३८० | ५५८ ८२ १५६ | ४४० ८९ २७० | ४५६ ५५ ४५६ | १२५ ८५ १६८ |
| २९९ ०२ ३४५ | १९९ ९० ३७० | ११२ ४६ ३४९ | १३८ २१ ५६० | ३४५ २३ १३९ | ११६ ८८ ३५० |
| २४७ ३७ १७९ | | | | | |

**सोमवार ३१/०३/२०२५**
मेन बाजार -७८०-५०-२४४
मिलन ना.-२४७-३७-१७९

**मंगळवार ०१/०१/२०२५**
मेन बाजार -
कल्याण-४६०-०४-३५६
मिलन डे -६७०-३६-३६७
मिलन ना.-

## नशिबाची परीक्षा

बुधवार ०२/०१/२०२५

*** मिलन डे ***
१४० २५८ १२२ **५-६** १५० १६९ ११४ | सिंगल ५-७-८
जोड ५२-९६-४७-८१-६०

*** कल्याण बाजार ***
१३० २४८ ६८० **४-९** १२६ १८० ११७ | सिंगल ४-२-६
जोड ४१-७९-२०-६८-९५

*** मुंबई (मेन) बाजार ***
१२० २३८ ३३७ **३-०** ११० २८० ४६० | सिंगल ३-१-९
जोड ३२-७०-६१-९८-०४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६


# क्लासिफाईड

**जाहिरात छोटी किमया मोठी**

### पाहिजेत

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२१९ दि.२९/३/२५)

### खरेदी विक्री

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाड्याने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२१९ दि.२९/३/२५)

### दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

### १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www.drpalve nashamuktikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही.एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

### उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही.एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

### देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/- प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

**सूचना**

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.